म.सं.कौ.हिं.सं.अर्ज क्र.१/२०२५
दिपाली वि. विठ्ठल

## निशाणी क्रमांक ०७ खालील आदेश

अर्जदार यांनी सदरचा अर्ज सामनेवाला यांचे विरुध्द पोटगी रक्कम वसुलीबाबत अटक वॉरंट पाठविणेसाठी केलेला आहे.

०२. अर्जदार यांचे कथनांनुसार, प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला यांचेकडून अद्यापही रक्कम रु.१,००,०००/- इतकी पोटगी रक्कम येणे बाकी आहे. तसेच प्रस्तुत कामी सामनेवाला हे न्यायालयात हजर राहणेस व पोटगी रक्कम भरणेस जाणिवपुर्वक टाळाटाळ करत असल्यामुळे, अर्जदार यांनी सामनेवाला यांचेविरुध्द पोटगी रक्कम वसुलीबाबत अटक वॉरंट पाठविणेत यावे अशी विनंती केली आहे.

०३. अर्जदारतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला याचे विरूद्ध अर्ज एकतर्फा चालविण्यात आला आहे.

०४. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.५७/२०२२ यामध्ये अर्जदार हिस दरमहा रू.२०००/- व अर्जदार क्र.२ यास दरमहा रू.१०००/- असा निर्वाह भत्ता अर्ज दाखल तारीख ०७.१२.२०२२ पासुन देण्याचा आदेश सामनेवाला याच्याविरूध्द पारीत केलेला आहे. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सामनेवाला यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदारांसाठी कोणतीही पोटगी रक्कम अदा केलेली नाही. तसेच सामनेवाला हे न्यायालयात गैरहजर आहेत व त्यांनी स्वतः किंवा त्यांच्या विधिज्ञांमार्फत पोटगी रक्कम न्यायालयात जमा केलेली नाही. यावरुन सामनेवाला यांनी अर्जदार यांना पोटगी अदा करणेबाबत कोणतीही तरतुद केलेली दिसुन येत नाही. त्यामुळे, सामनेवाला यांचेविरुध्द पोटगी रक्कम वसुल करणेसाठी वॉरंटचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

सामनेवाला यांचेविरुध्द रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रूपये केवळ) रुपयांसाठी पोटगी रक्कम वसुलीबाबत अटक वॉरंट पाठविणेत यावे.

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2025.06.18 16:54:24 +0530

मालेगांव
दिनांक : १८.०६.२०२५

[अ. सु. कोष्टी]
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२
मालेगांव जि. वाशिम.

# CERTIFICATE

I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Order **:-**

| | | |
|---|---|---|
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B.Patange (LG)** |
| 2. Court Name | :- | Jt. CJJD & JMFC, Malegaon |
| 3. Order dated | :- | 18.06.2025 |
| 3. Order Signed by the P.O. | :- | 18.06.2025 |
| 4. Order uploaded on | :- | 18.06.2025 |